**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad–431 004, Maharashtra, India**
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Academic : (0240) 2403118 /2403119/115

Web Site : www.bamu.ac.in

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**औरंगाबाद- 431 004, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section

कार्यालय :: शैक्षणिक विभाग ::

**संदर्भ क्र./ शैक्षणिक विभाग/ २०२२-२३/** 438 **दि.०७.०६.२०२२.**

**प्रति,**
**अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**औरंगाबाद.**

**विषयः-सर्व संबंधीत महाविद्यालयांनी नॅक व प्राचार्यांची पदे भरणेबाबत विद्यापीठाने दि. २८.०३.२०२२ रोजीच्या परिपत्रकांची तात्काळ अंमलबजावणी करुन अहवाल सादर करणेबाबत...**

संदर्भ : १) संदर्भ क्र. परिपत्रक/ शैक्षणिक विभाग/ २०२१-२२/ १०१९० दि. २८.०३.२०२२.
२) संदर्भ क्र. परिपत्रक/ शैक्षणिक विभाग/ २०२१-२२/ १०१९१ दि. २८.०३.२०२२.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदय यांनी दिलेल्या आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, **विद्यापीठाने उपरोक्त संदर्भ क्र. (१) व (२) अन्वये सर्व संबंधीत महाविद्यालयांना दि. ३१ जुलै, २०२२ पर्यंत नियमीत प्राचार्यांची पदे नियुक्त करणे तसेच नॅक मुल्यांकन/ पुनर्रमुल्यांकन/ फेरपुनर्रमुल्यांकन करुन सद्यस्थितीचा वस्तुनिष्ट अहवाल अनुक्रमे दि. ०७ एप्रिल, २०२२ व दि. १६ एप्रिल, २०२२ पर्यंत विद्यापीठास सादर करण्याबाबत निर्देशीत केलेले आहे.**

करीता, सदरील परिपत्रकांची महाविद्यालयीन स्तरावरुन तात्काळ अंमलबजावणी करुन त्याबाबतचा **वस्तुनिष्ठ अंमलबजावणी अहवाल विद्यापीठास दि. १०/०६/२०२२ पर्यंत सादर करण्यात यावा,** हि विनंती.

**उपकुलसचिव,**
**शैक्षणिक विभाग.**

**सोबतः** वरील प्रमाणे.

DrK'070622/-

DrKailas/Circular Doc.Pp-16

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad–431 004, Maharashtra, India**
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Academic : (0240) 2403118 /2403119/115

Web Site : www.bamu.ac.in

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**औरंगाबाद- 431 004, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section

कार्यालय :: शैक्षणिक विभाग ::

# * परिपत्रक *

**संदर्भ :** १. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० (४) अन्वये नॅक मुल्यांकन/ पुनर्रमुल्यांकन करणेबाबत असलेली तरतुद.

२. विद्यापरिषदेने दि. ३०.११.२०२१ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार पात्र दिनांकास नॅक मुल्यांकन न-करणाऱ्या महाविद्यालयास संलग्नीकरण रद्द करणेसंदर्भात नोटीस बजावणेबाबत.

मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशान्वये या परिपत्रकाद्वारे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व संलग्नीत अनुदानित/ कायम अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम संलग्नीत महाविद्यालयांचे व्यवस्थापक व प्राचार्य यांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० (४) व विद्यापरिषदेने दि. ३०.११.२०२१ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांना विस्तारीकरणाअंतर्गत विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, तुकडीवाढ व विद्याशाखावाढ तसेच जुन्या संलग्नीत महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास नवीन महाविद्यालयाची मान्यता मिळल्यास पात्र दिनांकास नॅक मुल्यांकन करणे आवश्यक असून तद्अनुषंगाने खालील प्रमाणे मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन करणे अनिवार्य राहील.

१) महाराष्ट्र शासनाने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अस्तित्वात/ **जुन्या संलग्नीत महाविद्यालयांना विस्तारीकरणाअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२** किंवा यापूर्वी विस्तारीकरणाअंतर्गत विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, तुकडीवाढ व विद्याशाखावाढ नुसार अभ्यासक्रम मंजूर केलेले आहेत परंतू सर्व संबंधीत महाविद्यालयांनी आजतागायत पात्र दिनांकास/ महाविद्यालयाच्या स्थापनेपासून पाच वर्षापर्यंत नॅक मुल्यांकन/ पुनर्रमुल्यांकन/ फेरपुनर्रमुल्यांकन विहित केलेल्या प्रक्रियेने विहित नियमानुसार करण्यात आलेले नसल्यामुळे सर्व संबंधीत महाविद्यालयांनी दिनांक ३१ जुलै, २०२२ पर्यंत पात्र महाविद्यालयांनी पात्र दिनांकास नॅक मुल्यांकन न-केल्यास किंवा तद्अनुषंगाने दिनांक १६ एप्रिल, २०२२ पर्यंत नॅक मुल्यांकनाबाबत वस्तुनिष्ट तपशिल विद्यापीठास सादर न-केल्यास सर्व संबंधीत महाविद्यालयांना **शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करीता संलग्नीकरण पत्र निर्गमीत करण्यात येणार नाही.** तसेच तद्अनुषंगाने सर्व संबंधीत महाविद्यालयामध्ये **आगामी शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही, याची कृपया गांभिर्याने नोंद घेण्यात यावी.**

२) महाराष्ट्र शासनाने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील **जुन्या महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करीता नवीन महाविद्यालय मंजूर केलेले असल्यास** सदरील जुन्या महाविद्यालयाचे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० (४) अन्वये पात्र महाविद्यालयांना पात्र दिनांकास नॅक मुल्यांकन/ पुनर्रमुल्यांकन/ फेरपुनर्रमुल्यांकन करणे आवश्यक असून उक्त प्रकरणी नियमामध्ये विहित केल्यानुसार विहित केलेल्या प्रक्रियेने पात्र दिनांकास नॅक मुल्याकंन न-केल्यास अशा स्वरुपाच्या **जुन्या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करीता संलग्नीकरण पत्र निर्गमीत करण्यात येणार नाही.** तसेच तद्अनुषंगाने सर्व संबंधीत महाविद्यालयामध्ये आगामी शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही, याची कृपया गांभिर्याने नोंद घेण्यात यावी.

३) प्रस्तुत प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ सुरु होण्यापूर्वी विद्यमान शैक्षणिक वर्षाच्या कार्यभारानुसार कायम विनाअनुदानित/ विनाअनुदानित महाविद्यालयांनी नियमीत अर्हताधारक प्राचार्य, ७५ % नियमीत अध्यापक, नियमीत ग्रंथपाल, नियमीत शारीरिक शिक्षण निदेशक/ Physical Director व इतर अनुज्ञेय शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची विहित मुदतीत विहित केलेल्या प्रक्रियेने विहित नियमानुसार नियुक्ती करणे अनिवार्य असून तद्अनुषंगाने कार्यवाही न-केल्यास संलग्नीकरणाबाबत फेरविचार करण्यात येईल.

४) प्रस्तुत प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ सुरु होण्यापूर्वी विद्यमान शैक्षणिक वर्षाच्या कार्यभारानुसार अनुदानित महाविद्यालयांनी नियमीत अर्हताधारक प्राचार्य, शासन नियमानुसार नियमीत अध्यापक, नियमीत ग्रंथपाल, नियमीत शारीरिक शिक्षण निदेशक/ Physical Director व इतर अनुज्ञेय शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची विहित मुदतीत विहित केलेल्या प्रक्रियेने विहित नियमानुसार नियुक्ती करणे अनिवार्य असून तद्अनुषंगाने कार्यवाही न-केल्यास संलग्नीकरणाबाबत फेरविचार करण्यात येईल.

५) प्रस्तुत प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करीता मान्यता प्राप्त अभ्यासक्रमांना विहित करण्यात आलेल्या प्रवेश क्षमतेपेक्षा अतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येवू नये. सर्व संबंधीत महाविद्यालयांनी आगामी शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेश क्षमतेपेक्षा अतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास सर्व संबंधीत विद्यार्थ्यांची विद्यापीठामार्फत परीक्षा आयोजित करण्यात येणार नाही तसेच तद्अनुषंगाने न्यायालयीन प्रकरणे उदभविल्यास याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाचे व्यवस्थापन व प्राचार्य यांची राहील, याची कृपया गांभिर्याने नोंद घेण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणी मुद्दा क्र. १ ते ५ अन्वये विनिदिर्ष्टित करण्यात आल्यानुसार सूचनांचे अनुपालन न-केल्यास व उक्त प्रकरणी न्यायालयीन प्रकरणे उदभविल्यास याबाबतची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयाचे व्यवस्थापन व प्राचार्य यांची राहील, याची कृपया गांभियाने नोंद घेण्यात यावी, हि विनंती.

**संदर्भ क्र. परिपत्रक / शैक्षणिक विभाग/ :**
**२०२१-२२/१०।५। :**
**:**
**दि. २८.०३.२०२२.**

**उपकुलसचिव,**
**शैक्षणिक विभाग.**

**प्रतिलिपी :**

१. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
२. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
३. अध्यक्ष/सचिव, सर्व संलग्नीत महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
४. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
५. उपकुलसचिव, आरक्षण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
६. कक्ष अधिकारी, पात्रता विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
७. जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
८. संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
९. समन्वयक, एम.के.सी.एल., राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

--

DrK*280322/-

28/3/2022

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad–431 004, Maharashtra, India**
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Academic : (0240) 2403118 /2403119/115
Web Site : www.bamu.ac.in

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**औरंगाबाद- 431 004, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :: शैक्षणिक विभाग ::

## * परिपत्रक *

मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशान्वये या परिपत्रकाद्वारे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व संलग्नीत अनुदानित/ कायम अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम संलग्नीत महाविद्यालयांचे अध्यक्ष/सचिव यांना सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ सुरु होण्यापूर्वी सर्व संबंधीत महाविद्यालयांनी विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन व विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या नियमानुसार, **विहित केलेल्या प्रक्रियेने, विद्यापीठाच्या विहित निवड समितीमार्फत संलग्नीत महाविद्यालयातील रिक्त असलेली नियमीत प्राचार्यांची पदे दि. ३१ जुलै, २०२२ पर्यंत नियुक्त करुन विद्यापीठाची मान्यता घेणे अनिवार्य आहे.**

प्रस्तुत प्रकरणी सर्व संबंधीत संलग्नीत महाविद्यालयातील विनाअनुदानित तत्वावरील महाविद्यालयांनी विहित प्रक्रिया करुन तात्काळ रिक्त असलेली प्राचार्यांची पदे तात्काळ भरणेबाबत महाविद्यालयीन स्तरावर कार्यवाही करण्यात यावी तसेच अनुदानित महाविद्यालयातील रिक्त असलेली प्राचार्यांची पदे भरणेबाबत शासन नियमानुसार आवश्यक कार्यवाही करुन सदरील पदे भरण्यात यावी तसेच तद्अनुषंगाने सद्यस्थितीत प्राचार्य पदाबाबतचा वस्तुनिष्ट तपशील दि. ७ एप्रिल, २०२२ पर्यंत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य असून उक्त प्रकरणी विलंब अथवा माहिती सादर करणेसंदर्भांत अनुपालन न-केल्यास आगामी वर्षाच्या संलग्नीकरण/ विद्यार्थी प्रवेशा बाबत फेरविचार करण्यात येईल, याची कृपया गांभिर्याने नोंद घेण्यात यावी.

**संदर्भ क्र. परिपत्रक / शैक्षणिक विभाग/ २०२१-२२/ 1०190** :
**दि. २८.०३.२०२२.** :

**उपकुलसचिव,**
**शैक्षणिक विभाग.**

28/3/2022

**प्रतिलिपी :**

१. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
२. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
३. अध्यक्ष/सचिव, सर्व संलग्नीत महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
४. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
५. उपकुलसचिव, आरक्षण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
६. कक्ष अधिकारी, पात्रता विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
७. जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
८. संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
९. समन्वयक, एम.के.सी.एल., राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

DrK*280322/-